INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 3 | APRIL - 2022

# महाराष्ट्राची प्रादेशिक संरचना

प्रा. डॉ. अनिल दत्तू देशमुख
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा, जि. उस्माााबाद.

## १ प्रस्तावना :-




१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होऊन पहिल्यांदाच सर्व मराठी भाषिक लोकांचे राज्य स्थापन झाले. त्यांच्यामध्ये पहिल्यांदाच राजकीय ऐक्य स्थापन झाले. क ांही ऐतिहासिक कारणामुळे मराठी भाषिक प्रदेश हे एकभाषी राज्याच्या संघर्षास सुरूवात होण्यापूर्वी वेगवेगळ्या प्रांतात विभागलेले होते. विदर्भाचा भूभाग मध्य प्रातांत होता. मराठवाड्याचा भूभाग हैद्राबाद संस्थानात होता, तर उर्वरित महाराष्ट्र हा मुंबई प्रांताचा भाग होता. या सर्व प्रांतात एकच व्यवहार न केल्यामुळे या प्रदेशांच्या विकासाची पातळी भिन्न दिसून येते. व्यवहारात त्यांचे वेगळेपण उठून दिसते त्यामुळेच सध्याच्या एकसंघ महाराष्ट्रामध्ये आजही वेगवेगळे उपप्रदेश दिसून येतात. त्यात प्रामुख्याने मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेश, वऱ्हाड इत्यादी प्रातांचा उल्लेख करता येईल.

आज आपण ज्याला महाराष्ट्र म्हणतो, त्या सर्व भूप्रदेशाला भिन्न भिन्न घटक विभागात महाराष्ट्र संस्कृतीची जोपासना होत होती. विदर्भ, अश्मक, कुंतल, अपरान्त, गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र ही त्या त्या विभागाची नावे प्राचीन संस्कृत वाङ मयात वारंवार आलेली आहेत. रामायण महाभारत या ग्रंथात विदर्भाचा अनेकवेळा उल्लेख आलेला आहे. अपरान्त म्हणजे कोकण हा प्रदेश प्राचीन काळापासूनच विदर्भाइतकाच प्रसिध्द आहे. नाशिक व नगर जिल्ह्यांचा अंतर्भाव अश्मकात होत असे. कुंतल हा कृष्णेच्या उगमाजवळचा देश आहे. नाशिकच्या सभोवतालचा प्रदेश म्हणजे गोपराष्ट्र व त्याच्या दक्षिणेला मल्लराष्ट्र होते. त्या सर्व प्रदेशात प्राकृत भाषा प्रचलित होती. आणि त्या सर्वांचा मिळून महाराष्ट्र बनला आहे.

ज्ञानेश्वरीत 'महाराष्ट्र मंडळ' असा शब्द आला आहे. महानुभावी वाङ मयात महाराष्ट्राचा उल्लेख दिसून येतो. तेंव्हा महानुभाव व ज्ञ ाानेश्वर कालखंडापासून मराठवाडा, विदर्भ, वऱ्हाड, पश्चिम महाराष्ट्र, कोकण हे सर्व भाग महाराष्ट्राचे म्हणून समजण्यात येत, पण ज्ञात अशा ऐतिहासिक कालखंडात हे सर्व भाग एकाच राजकीय एककात नव्हते. त्यामुळे हा प्रांत एकभाषी असला तरी प्रांतानुसार यांच्यात कांही वेगळेपण आजही आपल्या दृष्टीपथात येते. त्यामुळेच आजच्या एकसंघ महाराष्ट्रातही या उपप्रदेशांचे वेगळेपण टिकून दिसते. आज महाराष्ट्राच्या विकासाचा आढावा घेताना या उपप्रदेशांचा विचार केला जातो.

## २ महाराष्ट्रातील प्रादेशिक विभाग :-

प्रशासकीय सुविधेसाठी सध्या महाराष्ट्रात कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर असे सहा महसुली विभाग आहेत. असे असले तरी ऐतिहासिक व राजकीय मतानुसार महाराष्ट्राचे पाच मुख्य विभाग आहेत. १) देश किंवा पश्चिम महाराष्ट्र यामध्ये पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो.(पुणे विभाग)* २) उत्तर महाराष्ट्र विभाग यामध्ये नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार व जळगाव या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. यातील धुळे, नंदुरबार व जळगाव या तीन जिल्ह्यांच्या समूहाला खानदेश असेही नाव रूढ आहे.(नाशिक) ३) मराठवाडा विभाग यामध्ये औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद व लातूर या आठ जिल्ह्यांचा समावेश होतो.(औरंगाबाद) ४) विदर्भ किंवा बेरार या प्रांतात नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, बुलढाणा,

* कंसामध्ये सध्याचा महसुली विभाग दर्शविला आहे.

अकोला, वाशिम, यवतमाळ या आकरा जिल्ह्यांचा समावेश होतो.(नागपूर व अमरावती) ५) कोकण विभागात मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर** या सात जिल्ह्यांचा समावेश होतो.

भौगोलिक दृष्टीनेही महाराष्ट्राचे वेगवेगळे सहा विभाग दिसून येतात. त्यामध्ये अरूंद पूर्णा दरी हा पहिला विभाग दिसून येतो. त्यालाच संस्कृतमध्ये विदर्भ आणि मराठीमध्ये वऱ्हाड असे म्हणतात. तापी खोऱ्याचा दुसरा विभाग दिसून येतो, त्यालाच खानदेश असे म्हणतात. वर्धा, वैणगंगा खोऱ्याचा तिसरा विभाग दिसून येतो, त्यालाच नागपूर असे म्हणतात. अरूंद चिंचोळ्या पट्टीचा व सखल आणि सह्याद्रीच्या डोंगररांगांचा चौथा प्रांत त्याला कोकण असे म्हणतात. पाचवा विभाग हा गोदावरी नदीखोऱ्याचा त्यामध्ये नाशिक, अहमदनगर जिल्ह्यांचा भूभाग तसेच मराठवाड्यातीलही बराचसा भूभाग येतो. त्यानंतर सहावा विभाग हा कृष्णा नदीखोऱ्याचा दिसून येतो, त्यात भीमा-निरा नदीखोऱ्याचा समावेश होतो.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाने (NSSO) एकजिनसीपणाचा आधार घेऊन त्यात त्यांनी हवामान, पर्जन्य, अर्थव्यवस्थेचे स्वरूप इत्यादी मर्यादित घटकांचा विचार करून सर्वेक्षण केले होते. त्यात त्यांनी १९७१-७२ मध्ये महाराष्ट्राचे खालील सहा विभाग पाडले होते.

१) किणारपट्टीचा भाग : मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी.
२) पश्चिमेकडील भाग : अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर.
३) उत्तरेकडील भाग : जळगाव, धुळे, नाशिक.
४) मध्यवर्ती भाग : औरंगाबाद, बीड, परभणी, नांदेड, उस्मानाबाद.
५) पूर्वेकडील भाग : नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा.
६) पूर्व भाग : भंडारा, चंद्रपूर.

महाराष्ट्राचे वरील विभाग व त्यातील जिल्हे पाहिल्यानंतर असे दिसून येते की, यातील किणारपट्टीचा भाग हा कोकण या नावानेही ओळखला जातो. पश्चिमेकडील भागातील अहमदनगर सोडून इतर जिल्हे सध्या पुणे विभागात आहेत. उत्तरेकडील जिल्हे हे सध्या नाशिक विभागात येतात व त्यात अहमदनगर या जिल्ह्याचा समावेश झाला आहे. मध्यवर्ती विभागामध्ये सध्याच्या औरंगाबाद विभागाचा समावेश होतो, त्यालाच मराठवाडा या नावानेही ओळखले जाते. पूर्वेकडील व पूर्व विभागातील जिल्हे हे सध्याच्या नागपूर व अमरावती या विभागामध्ये येतात व त्यांचा विदर्भ या नावानेही सर्वांचा एकत्रित उल्लेख केला जातो.

१९८१ मध्ये महाराष्ट्र राज्याची प्रशासकीय संरचना बदलली. विकास योजनांची अंमलबजावणी व्यवस्थितपणे आणि कार्यक्षमतेने व्हावी यासाठी सहा महसुली विभाग करण्यात आले. या विभागामध्ये लोकांची भाषा बोलण्याची समान पध्दत, रूढी, परंपरा, रितीरिवाज याबाबतीत एकजिनसीपणा दिसून येतो. या सर्व विभागातील लोकांची भाषा एकच असली तरी विभागांतर्गत त्यांचे वेगळेपण आपणाला स्पष्टपणे दिसून येते. सध्या महाराष्ट्रातील हे सहा विभाग पुढीलप्रमाणे आहेत. १) कोकण विभाग यामध्ये बृहन्मुंबई, मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर या किणारपट्टीवरील सात जिल्ह्यांचा समावेश होतो. २) पुणे विभागात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. ३) नाशिक विभागामध्ये नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार व अहमदनगर हे पाच जिल्हे समाविष्ठ आहेत.
४) अमरावती विभागात अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. ५) नागपूर विभागात नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया या सहा जिल्ह्यांचा समावेश होतो. तर ६) औरंगाबाद विभागामध्ये औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, हिंगोली, उस्मानाबाद व लातूर या आठ जिल्हे समाविष्ठ आहेत. हे सर्व विभाग भौगोलिक सलगतेच्या आधारावर आधारलेले असले तरी या प्रत्येक विभागात ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक वेगळेपण दिसून येते.

### ३. सारांश / समारोप :-

अशा प्रकारे महाराष्ट्रामध्ये प्रादेशिक रचनेचे वेगवेगळे तीन नमुने दिसून येतात. आपणास महाराष्ट्राचे राजकीय, ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक एकतेच्या आधारावरही तीन विभागात वर्गिकरण करता येते. ते म्हणजे प्रदीर्घ काळ मुसलमानी निजाम राजवटीचा भाग राहिलेला मराठवाडा, ब्रिटिशांच्या मध्य प्रांतातील विदर्भ, व बिटिशकालीन मुंबई प्रांतातील मराठी भाषिक भाग म्हणजेच आपणाला महाराष्ट्राचे मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र असे तीन भाग पाडता येतात. सध्या महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करताना हे तीन भाग गृहित धरले जातात.

### संदर्भ ग्रंथ सूची

१. प्रा. डॉ. आशोक चौसाळकर, महाराष्ट्राचे राजकारण (लेख), नवभारत (त्रैमासिक), प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, सातारा, मे-जून २०१०, पृष्ठ क्रं. ४.
२. कॉ. ए. बी. वर्धन, अजून संघर्ष संपलेला नाही (लेख), लोकराज्य, सुवर्ण महात्सवी महाराष्ट्र विशेषांक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, एप्रिल-मे २०१०, पृष्ठ क्रं. १६.

** हा महाराष्ट्रातील ३६ वा नवीन जिल्हा असून १ ऑगष्ट २०१४ मध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून निर्माण केला गेला आहे.

३. प्रा. ए. बी. सवदी, द मेगा स्टेट महाराष्ट्र, निराली प्रकाशन, पुणे, (तृतीय आवृत्ती ) मार्च १९९९, पृष्ठ क्रं. २-३.

४. अरूण साधू, संयुक्त महाराष्ट्र स्वप्नपुर्ती की स्वप्नभंग (लेख), बदलता महाराष्ट्र , एन. डी. पाटील गौरव ग्रंथ, संपादक, भा. ल.भोळे व किशोर बेडकिहाळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी प्रकाशन, सातारा, १६ जुलै २००३, पृष्ठ क्रं. १२.

५. महाराष्ट्र विकिपिडिया, mr.wikipedia.org/wiki/महाराष्ट्र.

६. Karve Iravati, Maharashtra : Land and It's People, Government of Maharashtra, Bombay, 1975, P.N. 5-6.

7. Report of Fact Finding Committee on Regional Imbalance in Maharashtra, Planning Department, Government of Maharashtra, Bombay, 1984, P.N. 42.